# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.03.2026** **वार- रविवार**

---

**उड्डाणपूल**

पुण्यासारख्या वेगानं विकसित होणाऱ्या शहरासाठी मजबूत पायाभूत सुविधा अत्यावश्यक असून, शहराला वाहतूक कोंडीतून मुक्त करण्यासाठी शासन बहुआयामी नियोजन करत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितलं.
पुण्यातल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या समोरच्या एकात्मिक दुमजली उड्डाणपूलाचं लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दूरस्थ प्रणालीद्वारे करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याच्या मंत्री माधुरी मिसाळ, महापौर मंजुषा नागपुरे, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.
विद्यापीठ चौकातील जुना पूल पाडून नवीन दुमजली उड्डाणपूल उभारण्याचा निर्णय घेताना अनेक अडचणी आल्या; मात्र दिवंगत अजित पवार यांनी सर्वांना विश्वासात घेऊन हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केल्याचं मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं.
पुण्यात रस्त्यांसाठी उपलब्ध जागा मर्यादित असल्याने उड्डाणपूल, ग्रेड सेपरेटर, भुयारी मार्ग आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विस्तार या माध्यमातून वाहतूक व्यवस्थेचं आधुनिकीकरण केलं जात आहे, असं फडणवीस म्हणाले.

या उड्डाणपुलाला दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं नाव देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही त्यांनी दिली.
पुण्यातील वाहतूक कोंडीच्या समस्येवर दीर्घकालीन उपाय म्हणून, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हा दुमजली उड्डाणपूल उभारण्यात आला असल्याचं उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून पुणे जिल्ह्यातील अनेक महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांना गती देण्यात अजित पवार यांचं महत्त्वाचं योगदान असल्याचं त्यांनी सांगितलं.

**महिलादिन**

जागतिक महिला दिनानिमित्त आज सर्वत्र विविध उपक्रमांच्या माध्यमातून नारी शक्तीचा जागर करण्यात येत आहे.
राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे १४ ते १५ वर्ष वयोगटातल्या मुलींसाठी 'राज्यव्यापी एचपीव्ही लसीकरण' मोहिमेचा प्रारंभ आज होत आहे. राज्यातल्या ९ लाख ८४ हजारांहून अधिक मुलींना या मोहिमेचा लाभ मिळेल. हे लसीकरण पूर्णपणे मोफत आणि पालकांच्या संमतीने ऐच्छिक स्वरूपात होणार आहे.

महिला दिनाच्या पूर्वसंध्येला काल पुण्यात, स्वानंद सोशल फेडरेशन, कोहिनूर ग्रुप आणि संवाद पुणेतर्फे महिला पत्रकारांचा; आशा पुरस्काराने गौरव करण्यात आला.
महिला पत्रकारांची लेखणी सदैव जनसामान्यांच्या कल्याणासाठी, त्यांच्या हक्कांसाठी तळपत राहो, अशी अपेक्षा महापौर मंजुषा नागपुरे यांनी यावेळी व्यक्त केली.

जागतिक महिला दिनानिमित्त केशव शंखनाद पथकाच्या वतीने १ हजार १ महिलांनी सामूहिक शंखनाद करून जागतिक विक्रम केला.

**आशाकर्मचारी**

अंगणवाडी कर्मचारी, आशा कर्मचारी आणि अर्धवेळ परिचारिका अशा पदांवर सरकारच्या विविध योजनांमध्ये काम करणाऱ्या सुमारे ९ हजार कर्मचाऱ्यांना, भविष्य निर्वाह निधी आणि पेन्शन योजना लागू करण्याचा महत्त्वपूर्ण निकाल प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त अमित वशिष्ठ यांनी दिला आहे. सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियनचे अध्यक्ष अजित अभ्यंकर आणि सरचिटणीस वसंत पवार यांनी पुण्यात पत्रकार परिषदेत याविषयी माहिती दिली. त्यांनीच या प्रकरणी कर्मचाऱ्यांच्या वतीने बाजू मांडली होती.

**पुणेमनपा**

पुणे महानगरपालिकेचं 2026-27 या वर्षासाठीचं अंदाजपत्रक आयुक्त नवल किशोर राम उद्या सादर करणार आहेत.

**Pcmc**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून 'महापौर वैद्यकीय आर्थिक सहाय्य योजना' सुरू करण्यात आली आहे. यामध्ये आर्थिक दुर्बल नागरिकांना गंभीर आजार, उपचार किंवा शस्त्रक्रिया करण्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**बाजार समिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून 85 ते 90 ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक घटल्याने सर्वच फळभाज्या महागल्या आहेत. उन्हाचा चटका वाढल्याने सर्व पालेभाज्यांचे भावही वाढले आहेत. फळ बाजारात सर्वच फळांना चांगली मागणी असून आवकही मोठ्या प्रमाणावर होत आहे. तर फुल बाजारात भावामध्ये दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे.

**संजयसेठ**

विकसित भारताच्या उभारणीसाठी प्रत्येक युवकाने आपापल्या क्षेत्रात सर्वोत्कृष्ट कार्य करावं, असं आवाहन केंद्रीय संरक्षण राज्य मंत्री संजय सेठ यांनी काल पुण्यात केलं. एमआईटी विश्वशांती विद्यापीठामध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या द्रोणाचार्य स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचं उद्घाटन सेठ यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. नेमबाज अंजली भागवत आणि ग्रँडमास्टर अभिजित कुंटे यावेळी उपस्थित होते.

**विद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी ४ ते ७ मार्च या कालावधीत झालेल्या क्रीडाकुंभ- स्पर्धांचं बक्षीस वितरण काल झालं. बॅडमिंटन, क्रिकेट, बुद्धिबळ, बास्केटबॉल, टेबल टेनिस यासारख्या विविध क्रीडा प्रकारांमध्ये ४३० खेळाडूंनी भाग घेतला होता.

**हवामान**

पुणे शहर आणि परीसरात आज कमाल तापमान 37 तर किमान तापमान 16 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नाही.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू ताज्या पुणे वृत्तांतसह विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी ६ वाजता. नमस्कार.**